# Dacoits Arrested by Dhule Police

3 suspected persons with plan to dacoity arrested by Shirpur Police Station.



# दरोड्याच्या तयारीतील तिघे अटकेत

## शिरपूरची घटना; प्राणघातक शस्त्रांसह मिरची पावडर, कारही जप्त

**सकाळ वृत्तसेवा**

शिरपूर, ता. १२ : दरोड्याच्या पूर्वतयारीत असलेल्या तीन संशयितांना चांदपुरी (ता. शिरपूर) शिवारात् शिरपूर पोलिसांनी आज अटक केली. त्यांच्याकडील दरोड्यासंबंधी साहित्य व कार जप्त करण्यात आली. अन्य दोन जण फरारी झाले.

अर्थे- चांदपुरी रोडवरील चांदपुरी शिवारात रघुनाथ पटेल यांच्या शेतासमोर तीन ते पाच जण संशयितरीत्या फिरत होते. ही माहिती मिळाल्यानंतर शिरपूरचे पोलिस निरीक्षक मंगलसिंह सूर्यवंशी, उपनिरीक्षक संदीप वाघ, हवालदार गुरुदत्त पानपाटील, पोलिस नाईक श्रीकांत पाटील, रफिक मुल्ला यांनी मोहंमद अमीन अहमद रशीद अन्सारी (वय २३, रा. इलाही व्यायामशाळेजवळ, माधवपुरा, धुळे), अमीन अकबर शेख (२०, रा. खडवाडी मोहल्ला, सेंधवा, बडवानी), शाकीर फिरोज शेख (२६, मोतीबाग कब्रस्तानजवळ, सेंधवा) यांना अटक केली. संशयितांसोबत अन्य दोन अनोळखी २५ ते ३० वयोगटांतील तरुण होते. त्यांनी निळ्या रंगाची जिन्स पॅन्ट, काळे-पांढरे रंगाचे टी शर्ट परिधान केले होते. संशयितांच्या ताब्यातील इंडिका कारमध्ये (एमएच ६/जे ५३९१) दरोड्यासाठी वापरात येणारे साहित्य होते. हवालदार गुरुदत्त पानपाटील यांच्या फिर्यादीनुसार गुन्हा दाखल झाला.

### कार चोरीचा संशय

तत्पूर्वी, शहाद्याकडून सकाळी पावणेसातच्या सुमारास भरधा निघालेली इंडिका कार चांदपु गावाकडे जाताना विजय जानकीरा पाटील, बाबाजी गवळे आदीं पाहिली. त्यांना संशय आल त्यांच्यासह विनोद पटेल, जमी खाटीक, उदय पाटील आदींनी कारच पाठलाग केला. ते पाहून इंडिक कारचा वेग आणखी वाढला. मात्र चांदपुरी शिवारात इंडिकाला रोखण्या संबंधितांना यश आले. कारमधी दोन जणांनी पळ काढला. उर्वरि तीन जणांना ग्रामस्थांनी ताब्या घेतले. संशयितांना पोलिसांक सुपूर्द केल्यानंतर कारसह कोयता नायलॉनचा दोर, कटर, मिरच पावडरची पिशवी, लोखंडी टॉमी करवती, चार स्टार्टर, तीन बॅटरी इतर अवजारेही जप्त करण्यात आली कारही चोरीची असल्याचा संश आहे. पोलिस अधीक्षक साहेबरा पाटील, अप्पर अधीक्षक चंद्रकां गवळी, उपअधीक्षक प्रकाश सैंदा यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवा झाली.

### मुले पळविल्याची अफवा

संशयितांना शिताफीने पकडल्यानंतर परिसरात अफवांना ऊत आला. लहान मुलांना पळवून नेणारी टोळी सापडली आहे. शेतातील वीजपंप, केबल चोर सापडले असून त्यांच्याकडे पिस्तुलासारखी शस्त्रे असल्याच्या अफवांना पेव फुटले. सोशल मीडियावरून ही अफवा पसरली. चौकशीनंतर शिरपूर पोलिसांनी वस्तुस्थिती समोर आणली. संशयितांचा बऱ्हाणपूर-अंकलेश्वर महामार्गावरील वाहनांसह अर्थे परिसरातील घरांवर दरोडा टाकण्याचा प्रयत्न असल्याचा अंदाज आहे.